म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. ५३७०

क्रमिक ४५३

६७०
मराठी ग्रंथ संग्रहालय
क्रमांक ६७०
ता. .....
ठाणे.
६७०

९६०

# जुबिली-काव्य

किंवा

श्रीमंत सरकार सयाजीराव गायकवाड यांच्या पंचवीस
वर्षांच्या उदार व लोक-हितकारक कारकिर्दीबद्दल
त्यांच्या कृतज्ञ प्रजाजनांनीं केलेल्या
रौप्य-जुबिलीमहोत्सवाचें पद्यात्मक
संक्षिप्त वर्णन.

लेखक,

विष्णु सिताराम देव.

ॲक्टिंग मराठी शिक्षक, बडोदें हायस्कूल.

प्रकाशक,

दामोदर सांवळाराम आणि मंडळी.

मुंबई.

सन १९०७.

किंमत ८ आणे.

३०२

"INDU PRAKASH" STEAM PRESS, BOMBAY.

का. ग.



His Highness the Maharaja

SAYAJIRAO GAEKWAD,

BARODA.

क्रमांक ६८०
३०३

# अर्पण.

श्रीमंत सरकार

## सयाजीराव महाराज गायकवाड

सेनाखासखेल समशेर बहादूर

यांस;

त्यांच्या अंगीं असलेल्या

विद्वत्ता, बहुश्रुतता, सौजन्य, प्रजाहितदक्षता, परोपकार,

इत्यादि अनेक सद्गुणांस लोलुप होऊन

त्यांच्या

जुबिलीमहोत्सवासंबंधानें तयार केलेलें

हें लहानसें काव्य

त्यांचे चरणीं

परमादरानें अर्पण करण्यांत येत आहे.

श्रीमंतांचा नम्र सेवक

विष्णु सिताराम देव.

# प्रस्तावना.

इसवी सनाच्या अठराव्या शतकाच्या आरंभीं दक्षिणेंतील ज्या कित्येक मराठे घराण्यांतील शूर सरदारांनीं उत्तर हिंदुस्थानांत स्वाऱ्या करून मुसलमान सुभेदारांस त्या प्रांतांतून आपल्या बाहुबलानें हांकून लावून मुसलमानी अंमल नामशेष केला, व मराठी स्वराज्याची संस्थापना करून आपला भगवा झेंडा पश्चिम किनाऱ्यापासून पूर्वेपर्यंत अव्याहत सर्वत्र फडकविला, त्यांपैकीं गायकवाडांचें घराणें हें एक होय. ह्या राजघराण्याचा मूळ संस्थापक दमाजी (पहिला) गायकवाड असून त्यानें मराठे सरदारांच्या वतीनें दक्षिणेंत मुसलमानांशीं झालेल्या कित्येक लढायांमध्यें आपला अतुल पराक्रम गाजविला होता. दमाजी निवर्तल्यावर त्याचा मुलगा पिलाजी ह्यास त्याच्या बापाची सरदारी मिळाली, व त्यानेंही गुजराथेंत अनेक स्वाऱ्या करून व त्या प्रांतांतील निरनिराळ्या सुभेदारांस आपल्या तरवारीच्या जोरावर त्राहि त्राहि करून सोडून त्या प्रांतांत मराठ्यांचें वर्चस्व स्थापन केलें; परंतु अल्प अवकाशांतच तो डाकोर मुक्कामीं शत्रूच्या हातून दगलबाजीनें मारला गेल्यामुळें गुजराथेंत मराठ्यांची गादी स्थापन करण्याचें प्रत्यक्ष श्रेय पिलाजीचा मुलगा दुसरा दमाजी यासच मिळालें. त्यानें मुसलमानांस गुजराथेंतून पार हांकून लावून आपली गादी प्रथमतः पट्टण येथें स्थापिली,

व तेथून पुढें कांहीं विशेष कारणांमुळें ती बडोद्यास आणली. ह्या गोष्टीस आजमितीस सुमारें दोनशें वर्षें होऊन गेलीं आहेत.

बडोद्याच्या ह्या गायकवाडी राजघराण्यांत आजपर्यंत पिलाजी, दमाजी, गोविंदराव, आनंदराव, सयाजीराव ( थोरले ) गणपतराव, खंडेराव, मल्हारराव, इत्यादि नामांकित राजपुरुष होऊन गेले; परंतु त्या बहुतेक सर्वांच्या कारकिर्दींत सर्वत्र अस्वस्थतेचें प्राबल्य असल्यामुळें प्रजेच्या हिताकडे लक्ष्य देण्यास त्यांस फुरसतच मिळाली नव्हती असें ह्मटलें तरी चालल. तथापि कै. श्री. खंडेराव महाराजांनीं आपल्या कारकिर्दींत प्रजाहिताच्या कांहीं गोष्टींचा पाया घातला होता; व पुढें त्यांचे मागें मल्हारराव महाराजांस गादी मिळून पुरतीं चार वर्षें लोटलीं नाहींत तोंच त्यांस ब्रिटिश सरकारानें पदच्युत केल्यामुळें त्यांच्या हातून प्रजाहित होण्यास फारशी संधीच आली नाहीं. त्यांच्या मागें गादीला औरस वारस कोणी नसल्यामुळें कै. खंडेराव महाराजांची विधवा कै. मातुश्री महाराणी जमनाबाई साहेब यांच्या मांडीवर योग्य असा गायकवाडी घराण्यांतील मुलगा ब्रिटिश सरकारानें पसंत करून त्यास दत्तक दिलें. हेच आमचे हल्लींचे दयाळू श्रीमंत सयाजीराव महाराज होत. हे गादीवर बसल्या दिवसापासूनच गायकवाडी राज्यकारभारांत एक प्रकारची क्रांती घडून येऊन त्यास नवें वळण लागलें, असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

श्रीमंत सयाजीराव महाराज हे सन १८७५ सालीं बडोद्याच्या गादीवर बसले; परंतु ते ह्या वेळेस अल्पवयी असल्यामुळें राज्याचा सर्व कारभार दिवाण राजा सर टी माधवराव यांच्या हातीं होता. गादीवर बसल्यानंतर सात वर्षेंपर्यंत महाराजांस एलियट साहेबांच्या हस्तें सर्व प्रकारचें शिक्षण पूर्णपणें मिळालें. इतक्या अवधींत महाराजांस चाद्ध शिक्षणा-

काव्य ६७०



खेरीज राज्यांतील दिवाणी, फौजदारी, न्याय, जमाबंदी, वगैरे सर्व खात्यांची आवश्यक माहिती करून देण्याची योग्य तजवीज केलेली होती. पुढें सन १८८१ सालीं आमचे महाराज राज्याधिकार चालविण्यास सर्वस्वी योग्य आहेत असें ब्रिटिश सरकारास दिसून आल्यामुळें त्यांनीं त्या वर्षाच्या अखेरीस महाराजांच्या हातीं यथाविधि राज्याचीं सर्व सूत्रें दिलीं; आणि तेव्हांपासून आजमित्तीपर्यंत महाराज आपला राज्यशकट धूर्ततेनें व शहाणपणानें हांकीत आहेत.

सन १८८२ पासून सन १९०७ पर्यंत म्हणजे जवळ जवळ पंचवीस वर्षांच्या कारकिर्दींत श्रीमंतांनीं प्रजेच्या कल्याणासाठीं जीं जीं सत्कृत्यें केलीं, त्यांचें सविस्तर वर्णन करूं लागलों तर मोठमोठे ग्रंथचे ग्रंथ होतील. म्हणून थोडक्यांत त्या सर्वांचा उल्लेख ह्या ठिकाणीं सामान्यतः करतों. महाराजांच्या हातीं कारभार आल्यापासून आपल्या हातून प्रजेचें कल्याण कोणत्या रितीनें होईल, व त्या कामीं कोणकोणते उपाय योजावे ह्या गोष्टी त्यांच्या मनांत अहोरात्र घोळत आहेत, व त्या कामीं त्यांच्या आरोग्यास कित्येक वेळां जबर धक्का पोंचल्यामुळें आजपर्यंत पांच-सहा वेळां आपल्या तनदुरुस्तीसाठीं त्यांस परदेशांतही जावें लागलें आहे. परंतु त्यांचें परदेशगमन म्हणजे केवळ आपल्या ऐषआरामाकरितां नसून त्यांत त्यांचा नेहमीं दुहेरी हेतु असे. आरोग्यसंपादनाचा हेतु तर खरा, पण त्याबरोबरच युरोप, अमेरिका, व एशियाखंडाचा कांहीं भाग यांतील मुख्य मुख्य प्रदेशांत प्रवास करून त्या देशांतली लोकस्थिति, कारागिरी, कलाकुशलता, व्यापारधंदा, सांपत्तिकस्थिति, वगैरे उपयुक्त बाबतींचेंही त्यांनीं परिज्ञान करून घेतलें, व त्याचा अमोलिक लाभ ते आपल्या प्रिय रयतेस आजमित्तीस देत आहेत. प्राथमिक शिक्षण, वरिष्ठ शिक्षण, धंदे-

शिक्षण, कृषिकर्मशिक्षण, वगैरे उपयुक्त प्रकारचें शिक्षण, ते आपल्या प्रजेस मोठ्या खर्चानें देत आहेत. सक्तीचें शिक्षण तर त्यांनीं आपल्या राजाच्या बहुतेक सर्व भागांत चालू केलें आहे; आणि असाच क्रम जर आणखी कांहीं वर्षे चालू राहिला, तर थोड्याच कालांत बडोदें राज्य हें ब्रिटिश राज्याच्या तोडीचें–किंबहुना त्याहूनही अधिक सुधारलेलें–असे उद्गार लोकांच्या तोंडून वारंवार ऐकूं येतील अशी आशा बाळगण्यास कारण आहे.

सयाजीराव महाराजांनीं आपल्या राज्यांत ज्या अनेक उपयुक्त सुधारणा घडवून आणल्या, त्यांपैकीं मुख्य ह्मटल्या ह्मणजे शहरसुधारणा खातें, स्थानिक स्वराज्य, पंचायत सभा, शेतीवाडी खातें, रेल्वेचा प्रसार, व्यापारवृद्धि, न्याय व अंमलबजावणी या दोहोंचें पृथक्करण, पाटबंधारे, लोकांस पिण्यास गोडें पाणी मिळण्याची व्यवस्था, पडित जमिनींची लागवड, शेतकऱ्यांस तगावी देणें, धर्मार्थ दवाखाने, वरिष्ठ शिक्षण, सक्तीचें शिक्षण वगैरे हात; व ह्याच कारणांमुळें गायकवाडी प्रजेच्या तोंडांतून प्रत्यहीं निसर्गतःच अनेक आशीर्वाद निघत आहेत, व ती सर्व प्रकारें महाराजांची अत्यंत ऋणी आहे. महाराजांनीं आज पंचवीस वर्षेपर्यंत प्रजेचें हित साधण्यासाठीं आपल्या जिवाची पर्वा न बाळगतां जे जे अश्रांत श्रम केले, व द्रव्याची मोठी झीज सोसली, त्याबद्दल आपण महाराजांच्या ऋणांतून अल्पभागशः तरी मुक्त व्हावें, व आपली निर्मळ व निःसीम स्वामिनिष्ठा महाराजांच्या निदर्शनास आणावी, असा विचार प्रजेचे विद्वान् पुढारी यांच्या मनांत एके दिवशीं येऊन त्यांनीं त्या बाबतीचा खल करण्यासाठीं प्रमुख लोकाग्रणींची सभा बोलाविली; व तींत बहुमतानें असें ठरलें कीं आपली राजनिष्ठा कोणत्यातरी रूपानें महाराजांला व्यक्त करणें हें

आपलें पवित्र व अवश्य कर्तव्य आहे आणि ह्मणून प्रत्येकानें त्या कार्यासाठीं कायावाचामनेंकरून झटण्याचें कबूल केलें, व पाश्चिमात्य रिवाजाप्रमाणें आपल्या दयाळू श्रीमंतांची पंचवीस वर्षांच्या सुखकारक कारकिर्दीची रौप्यजुबिली केवळ प्रजेच्या खर्चानें करण्याचें सर्वानुमतें ठरलें.

ह्या रौप्यजुबिलीमहोत्सवाचें मुख्यतः अग्रेसरत्व दिवाण बाहादूर केशोरपजी यांनीं पत्करिलें होतें. त्यांनींच ह्या शुभ समारंभास श्री. महाराजांची मंजूरी मिळविली, व नंतर पुढें होणाऱ्या खर्चाचा एकंदर अंदाज करून त्याप्रमाणें वर्गणी जमविण्याकरितां बडोदें राजधानींत व इतर प्रांतांत हुशार अशा कार्यकारी मंडळीची योजना केली. हा मंगल समारंभ थाटानें उरकण्यास उत्तम मुहूर्त फाल्गुन वद्य षष्ठि मंगळवार—ह्मणजे ज्या दिवशीं महाराजांचा वाढदिवस व्हावयाचा तो ठरला; कारण हा ठरविण्यांत विशेष फायदा हा होता कीं, होळीचा सण व महाराजांचा वाढदिवस मिळून सर्व राज्यांत आठ दिवसांची रजा पाळण्याचा परिपाठ आहे; आणि त्यांत या जुबिलीच्या संबंधानें आणखी चार दिवस ज्यास्त दिले, ह्मणजे एकंदर रजा बारा दिवसांची होऊन सर्व लोकांस हा महोत्सव यथास्थितपणें करण्यास चांगली सवड मिळेल. ह्या महोत्सवाचा कार्यक्रम दिवाण बाहादुरांनीं स्वतः तयार करवून त्याप्रमाणें त्याच्या नकला सर्व प्रांतांतील पुढाऱ्यांकडे पाठवून दिल्या; व मुख्य राजधानींत त्या संबंधानें सर्व प्रकारची तयारी करण्याचें काम सुरू केलें, व फाल्गुन शुद्ध पौर्णिमेच्या आंतच नगर—शृंगार वगैरे सर्व तयारी झाली.

फाल्गुन वद्य षष्ठीचा दिवस म्हणजे गायकवाडी राज्यांत सोन्याचाच दिवस असें सर्व प्रजाजनांस वाटलें, व तो आनंदानें पार पाडण्याच्या कामीं सर्वांची परमोत्कंठा दिसून आली.

सर्व गरीबगुरीब आबालवृद्ध नरनारी, संक्षेपतः सर्व जातींचे व दर्जाचे लोक मंगळवारची सकाळ केव्हां उगवते याची उत्कंठेनें वाट पाहात होते. शेवटीं तो सोन्याचा दिवस उगवला. चोहोंकडे शहरांत आधींपासून सर्व प्रकारची तयारी होतीच. त्याप्रमाणें त्या दिवशीं सकाळीं श्रीमंतांची स्वारी मंगल-तैलाभ्यंगस्नान करून विद्वान् वेदमूर्तींचे वेदोक्त आशीर्वाद घेऊन रथारूढ झाली, व एकंदर लष्कर व सर्व प्रकारचा इतर लवाजमा व सरकारी अंमलदार यांसहवर्तमान मिरवत मिरवत व दुतर्फा लोकांचे नम्रपणें मुजरे घेत राजमहालच्या रस्त्यावरून मांडवीवरून चांपानेरच्या दरवाजानें ह्याच समारंभासाठीं खास पसंत केलेल्या वारेशाच्या मैदानावरील उभारलेल्या भव्य दरबारमंडपाकडे गेली. स्वारी आसनारूढ होतांच ठरल्याप्रमाणें लष्करी सलामी झाली, प्रजेच्या तर्फेनें महाराजांस मानपत्र वाचून दाखवून मोठ्या लीनतेनें अर्पण करण्यांत आलें; आणि नंतर पानसुपारी वगैरे होऊन हा अपूर्व समारंभ आटोपल्यावर स्वारी परत निघाली, व मार्गांत अनेक संस्था, वृत्तपत्रें, मंदिरें, छापखाने, निरनिराळे समाज, सरदार, दरखदार, मानकरी, स्थानिक लोकलबोर्डे, वगैरेंच्या पानसुपाऱ्या व मानपत्रें घेत घेत व सर्वांस समयोचित असें भाषणद्वारें उत्तर देत राजमहालांत गेली. ह्या दिवशीं रात्रीं सर्व शहरांत लोकांनीं मोठा दीपोत्सव केला, व तो पाहण्यासाठीं स्वारी स्वतः परिवारासहवर्तमान बरोबर अगदीं मित लवाजमा घेऊन, रोषनाई पाहण्यासाठीं सर्व शहरभर फिरली. इतर चार दिवसांत लष्करी कवाईत, बालबालिकासंमेलन, मुलांमुलींस मिठाई वाटणें, आगडांतील खेळ, शिकार, गरिबांस अन्नवस्त्रदान, कॉलेज व हायस्कूल यांतील प्रोफेसर, शिक्षक व विद्यार्थी यांनीं शेवटच्या दिवशीं मशालींच्या तेजस्वी प्रकाशांत महाराजांची मिरवणूक अपूर्व थाटानें कालेजापासून

राजमहालापर्यंत काढणें, वगैरे गोष्टी होऊन ह्या अपूर्व समारंभाची गोड परिसमाप्ति झाली.

हा उत्सव चिर-स्मरणीय व्हावा म्हणून महाराजांचें स्मारक कोणत्या तरी रूपानें करावयाचें असें उत्सवचालक मंडळीचें ठरलें आहे, व तें लवकरच होईल. अशाच हेतूनें श्री. महाराजांच्या लीन सेवकानें महाराजांचे आंगचे अमोलिक गुणांचें व त्यांनीं प्रजाहितार्थ केलेल्या अनेक कृत्यांचें स्मारकरूपी पद्यात्मक वर्णन यथामति करून महाराजांचे उतराई होण्याचें मनांत आणलें, व त्याप्रमाणें तें संक्षेपतः पुरें करून श्रीमंतांच्या पवित्र चरणीं तो परमादरपूर्वक अर्पण करीत आहे. तें महाराज कृपा करून वाचून पाहतील, व हंसक्षीरन्यायानें त्यांतील दोषांकडे लक्ष्य न देतां गुणलेशाचेंच ग्रहण करितील, अशी महाराजांच्या चरणापाशीं नम्र सेवकाची सविनय प्रार्थना आहे.

बडोदें हायस्कूल
जून १९०७.

लीन सेवक,
विष्णु सिताराम देव.

॥ श्री ॥

श्रीमत्सयाजीनृपतयेनमः

# जुबिलीकाव्य.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ३९३
संग्रह शाखा

## १. मंगलाचरण.

शार्दूलविक्रीडित.

आदौ श्रीगणनायकप्रभु सदा सद्बुद्धिसिद्धिप्रद ॥
जो विघ्नां हरि सूर्यसा तिमिरहा जो श्रेष्ठविद्यास्पद ॥
यत्पादाब्ज-सुरम्यधूलि शिरसावंद्या सुरां सर्वदा ॥
तो सन्मंगलमूर्ति शीघ्र निरसो भक्ताचिया आपदा ॥ १ ॥

## २. कवन-स्फूर्ति.

शार्दूलविक्रीडित.

सेवाधर्म मनांत आणुनि महा हें कार्य आरंभितों ॥
कैंवी जाइल शेवटा परि असें चित्तांत येतां भितों ॥
कोठें ती नृपकीर्ति कोठ लवथी मी साच पंगू जसा ॥
शैलोल्लंघनिं कष्ट थोर करितो हा यत्न माझा तसा ॥ २ ॥

## ३. नायक-नामनिर्देश.

स्रग्धरा.

श्रीमत्प्रौढप्रतापी सुगुणगणयुत ज्ञानभांडार गाजी ॥
गाजी यत्कीर्ति सारा शुभ अवनितलीं शत्रु ज्यातें न गांजी ॥
राजी सारी प्रजा ज्या वरुनि पति असा हर्ष मानी धरा जी ॥
गा जी तो गुर्जरांचा प्रभु दिनरजनी पार्थिव श्रीसयाजी॥३॥

## ४. धन्यवाद.

स्रग्धरा.

जन्मा गाईकवाडाभिध कुल जगिं त्या देउनी धन्य झालें ॥
धन्या ती मातृकुक्षी खचित जिथुनि सद्रत्न ऐसें निघालें ॥
तो काशी धन्य त्याचा जनक सुत जया होय हा साधुमान्य ॥
धन्या ती गुर्जरक्ष्मा बुधमत चिमणाबाइ राज्ञीहि धन्य ॥ ४ ॥

स्रग्धरा.

तो खंडेराव मानी बहुत निजमनीं हर्ष कैलासवासी ॥
बोले मी धन्य झालों वरुनि तनय मद्वंश वाढावयासी ॥
अंकीं घेवोनि झाली गुणखनि जमना धन्य ती थोर राणी ॥
धन्या ती राजधानी नृप सुखद जिला लाभला हा शिराणी॥५॥

स्रग्धरा.

लाभोनी गूजराथी प्रभु नृपवर हा धन्य झाली प्रजा ती ॥
झाल्या तेंवी बडोदेंपुरगत अवघ्या धन्य अन्याहि जाती ॥
तो झाला धन्य ज्याचे सहजाचि नशिबीं हा महायोग आला ॥
गाया सत्कीर्ति शुद्धा अवनिपतिचिया वंदुनि श्रीपदांला ॥६॥

## ५. राज्यारोहण-शक.

शार्दूलविक्रीडित.

ऐसा राज्यपदावरी नृपति हा आरूढ झाला यदा ॥
संवच्छ्रीनृपविक्रमार्क बरवा होता रिघाला तदा ॥
एकोणीस शतें तयांत अधिकें तीं आठ अब्दें भरी ॥
होतीं ख्रिस्तशकासि तेंवि अठराशें दोन ऐशींवरी ॥ ७ ॥

### ६. पंचवीस वर्षांतील सत्कृत्यें.

स्रग्धरा.

तेव्हांपासोनि आतांवरि शुभ वरुषें जाहलीं पंचवीस ॥
या ऐशा अल्पकालीं नृपतिसुकृति ती वर्णवेना कवीस ॥
त्यागोनी स्वार्थ ठेवी स्वमति जनहितीं प्राज्ञ सन्मान्य राजा ॥
अर्पी देशोन्नतीचेस्तव तनमनही साधण्या लोककाजा ॥ ८ ॥

### ७. परदेशगमन.

शार्दूलविक्रीडित.

सप्तद्वीपवती समस्त वसुधा जे ज्ञात हो संप्रती ॥
तीमाजी वरचेवरी फिरुनियां जेथें न अन्या गती ॥
संपादी सकला कलाकुशलता देशाटनें भूपती ॥
ज्ञानाचा निधि तो वटोदरपती ये स्वा गृहा मागुती ॥ ९ ॥

शार्दूलविक्रीडित.

नानादेश अमेरिका युरपही आला फिरोनी पहा ॥
केले थक्क नृपाल सर्व अपुल्या वाक्पाटवें ,कीं महा ॥
आंग्ल फ्रान्स इतालि जर्मनिमही तो कानडा आस्त्रिया ॥
स्वित्सर्लंद फिरे न शेष उरली त्याची प्रवासक्रिया ॥१०॥

### ८. चांगुलपणाबद्दल परकीयांचा ग्रह, व त्यांजकडून बहुमान.

शार्दूलविक्रीडित.

झाली ख्याति जगांत थोर ह्मणुनी विद्याभिलाषी असा ॥
राजा कोठ न सांपडे समजती कीं हा न सामान्यसा ॥
भेटीसाठिं धरेश नित्य झटती प्रेमेंहि पाचारिती ॥
वस्त्रालंकरणाद्युपायनविधी त्या सर्व आचारिती ॥ ११ ॥

इंद्रवज्रा.

सर्वज्ञही मित्र अनेक केले ॥
जे ज्ञानसंपादनिं कीं भुकेले ॥
त्यांतोनि अत्युत्तम मानसांत ॥
जे वाटले आणियले महान्त ॥ १२ ॥

शिखरिणी.

अशा योगें मोठा अनुभव जगाचा मिळविला ॥
विलायत्तेशांचा भ्रम उलट तोही पळविला ॥
विलासीं हा नासी न समय कधीं तोचि ह्मणती ॥
न ती वाणी खोटी नृपसुजनते नाहिं गणती ॥ १३ ॥

## ९. ज्ञान-संपादन.

शार्दूलविक्रीडित.

ऐसें त्या श्रमवोनि देह बरवें नानाविध ज्ञान तें ॥
सांगोपांग सहोपपत्तिक मिळे तो देतसे लोकतें ॥
साही कष्ट सदा प्रजा निज सुखी व्हायासि सारे महा ॥
देशाचें अतिदैन्य दूर करणें ही थोर ज्याला स्पृहा ॥ १४॥

## १०. आपल्या संस्थानांत संचार.

शार्दूलविक्रीडित.

प्रांतोप्रांत फिरोनि नित्य आपुल्या तो भूप राज्यांतरीं ॥
कैसी शासनपद्धति प्रचालिता पाही स्वदृष्टी खरी ॥
दुःखी वा ससुखा प्रजा वसतसे वा कैंवि लोकस्थिती ॥
किंवा तो अधिकारिवर्ग अपुला गांजी प्रजेला किती ॥१५॥

स्रग्धरा.

एवं संशोधकामी नृप सतत अशा ठेवि नित्यक्रमाला ॥
तेणें साराहि राजाधिकृत जन असे भीतिमाजी निमाला ॥
जैसा शार्दूल येतां मृगगण अवघा मानसीं तो थरारे ॥
तैसें हो जेथजेथें प्रभु गुणनिधि हा जातसे कीं खरा रे॥१६॥

पंचचामर.

नृपालकोप हो कदा न हें मनांत जाणती ॥
स्वकर्मदक्ष सत्यपंथगामि सर्व राहती ॥
कधीं अनीति वा कुरीति आचरीति लोकते ॥
निबंधबद्ध वागती नृपाधिकारि लोक ते ॥ १७ ॥

द्रुतविलंबित.

नियतशासनपद्धति ही बरी ॥
नृप सदा निजदेशिं सुधी वरी ॥
मनुज दुःखित कोणि न सांपडे ॥
नच कुणासि दरिद्रदशा नडे ॥ १८ ॥

११. विद्वान् व सुशिक्षित लोकांची नेमणूक.

शार्दूलविक्रीडित.

जे शुद्धाचरणी प्रबुद्ध सुगुणी ज्ञानी सुमार्गी भले ॥
विद्यालंकृत आंग्लमान्यपदवीधारी असे लाभले ॥
त्यांतें शोधुनि आणुनी त्वरितही राज्यांतरीं आपले ॥
योजी थोर पदांवरी बुधजनीं ज्ञानेंचि जे मापले ॥ १९ ॥

वसंततिलका.

त्यांचे बघोनि दडला मतिचापलाला ॥
अन्याय सर्व दुरि या महिचा पळाला ॥

येतांचि जेंवि उदयासि पिता यमाचा ॥
पावे लया त्वरित गर्व महातमाचा ॥ २० ॥

१२. त्याचा गोड परिणाम.

वसंततिलका.

होतां प्रजा सकल वैभवसौख्यशाली ॥
थारा अनीतिस न देशिं जनां खुशाली ॥
आली पुरा धनसमृद्धि दिगंतकीर्ति ॥
झाली दिसे जनमनांत सयाजिमूर्ति ॥ २१ ॥

१३. अनाथांचा परामर्ष.

शार्दूलविक्रीडित.

ऐसा तो समदृष्टि भूप सकलां लोकांसि बापापरी ॥
पाळी दीन अनाथ दैवहत ही कोठें दिसेना परी ॥
अंगें तो जन अंध पंगु बघतां त्यांतें सदा सांवरी ॥
देई त्यां वसनान्नदान कृति ही टाकी न दासांवरी ॥ २२ ॥

१४. गरिबांची दाद लागेल अशी व्यवस्था.

स्रग्धरा.

राष्ट्रीं चाले विशुद्धा स्वजनसुखदशी राज्यरीती जरी ती ॥
त्यांची ती दाद लागे अनयविहत जे अर्ज कोणी करीती ॥
ऐके एकाग्रचित्तें सविनय विनती ती तयांची स्वहातें ॥
दे योग्य न्याय साचा स्वमनिं विचरुनी नित्य निष्पक्षपातें ॥ २३ ॥

१५. महाराजांचे गुण.

अनुष्टुप्.

राजा हा परमेधावी विलसे सुगुणाकर ॥
तयाचा न जगीं कोणी दुसरा धरिता कर ॥

वाजीहृदयविज्ञाता सुविद्यासंस्कृतांतर ॥
स्वप्रजारक्षणाकांक्षी बुद्धिवैभव दुस्तर ॥ २४ ॥

शार्दूलविक्रीडित.

पुण्यश्लोक सुधीर आजवरती झाले जगीं भूपती ॥
जे नामें नल तो युधिष्ठिर तसा श्रीराम सीतापती ॥
ज्यांचें ऐकुनि नाममात्र अवघे तच्छत्रुही कांपती ॥
तैसा हा नृप या बडोदरपुरीं नांदे सुखें संप्रती ॥ २५ ॥

### १६. प्रजाहितार्थ कृत्यें.

मंदाक्रांता.

देशोदेशीं अटन करुनी पाहुनी लोकरीती ॥
स्वोन्नत्यर्थ श्रम जन किती दक्षता आचरीती ॥
ज्ञाना ऐशा विविध मिळवी स्वप्रजासौख्यकारी ॥
देई प्रेमें स्वकिय जनते भूप तो निर्विकारी ॥ २६ ॥

### १७. न्याय व अंमलबजावणी हीं निराळीं केलीं.

वसंततिलका.

तीं न्याय-अंमल-बजावणि दोन खातीं ॥
जीं होतिं एकवट दुःखदशीं पहा तीं ॥
यद्रीति लोकहितघातक पूर्वकालीं ॥
भूपा निजानुभवसिद्ध कळोनिं आली ॥ २७ ॥

वसंततिलका.

तीं दोन भिन्न करि योजि महाधिकारी ॥
तो त्यांवरी सकलगुर्जरदैन्यहारी ॥

लोकांवरी बहुत हा उपकार केला ॥
आशीःप्रदानिं म्हणुनी जन त्या भुकेला ॥ २८ ॥

### १८. उच्च शिक्षण.

वसंततिलका.

श्रेष्ठा प्रजे सुख दशा निज सत्य यावी ॥
ती स्वावलंबनरता सततीं असावी ॥
योजी उपाय बहु शिक्षण उच्च द्याया ॥
कार्यी उदारमति अर्पि धना महा या ॥ २९ ॥

### १९. पंचायत सभा व स्थानिक स्वराज्य.

मंदाक्रांता.

गांवोगांवीं जनहितकरा तो महालोमहालीं ॥
स्थापी पंचायत-वरसभा नष्ट व्हाया अघाली ॥
पौरां हातीं सकल दिधलें तें पुरी-सूधराई- ॥
खातें केली प्रकट अपुली या कृतीनें भलाई ॥३०॥

### २०. धंदेशिक्षण व औद्योगिक चळवळी.

शार्दूलविक्रीडित.

चिंता चित्तिं सदैव जागृत जया कीं स्वराज्यांतरीं ॥
धंदे-हुन्नरसत्कलाकुशलता कीं वाढती सत्वरी ॥
जेथें अल्पहि चालती चळवळी औद्योगिका त्यां करी ॥
साह्या तो स्वजनोन्नतिस्तव झटे रात्रंदिनीं यापरी ॥ ३१ ॥

सं.काव्य
८७०



२१. सयाजी सरोवर.

शार्दूलविक्रीडित.

अब्दें त्रस्त कितीक लोक असती क्षारांबु-पानें परा ॥
बांधी यास्तव शुद्धनीरविपुला नामें सयाजीसरा ॥
तेणें तुष्ट समस्त नागरिक ते मिष्टा जलाला पिती ॥
ध्याती त्या सदया गुणाकर नृपा आशीर्वचें अर्पिती ॥३२॥

२२. सांपत्तिक-स्थिति-सुधारणा.

शार्दूलविक्रीडित.

कैंवी ती सुधरेल आर्यमहिची सांपत्तिकाख्या स्थिती ॥
चिंती शोधि अनेक मार्ग नच तद्देशाभिमाना मिती ॥
लक्षी प्रत्यहिं तो तदभ्युदयदा पंथा स्वयें आदरी ॥
मांडी नित्य जनांपुढें निजमतें ही देशसेवा धरी ॥ ३३ ॥

२३. दुष्काळ-पीडितांस मदत.

शार्दूलविक्रीडित.

ईशक्षोभवळें अवर्षण पडे राज्यप्रदेशीं स्वकीं ॥
होई तैं नृप सानुकंप बघुनी ती निष्फला शेतकी ॥
देई सूट कृषीवलां बहुतशी दानीं करी संचय ॥
पुण्याचाचि जनासु वांचवुनि तो नीवारि लोकक्षय ३४॥

२४. तन्निवारणार्थ उपाय.

शार्दूलविक्रीडित.

मोठे थोर तलाव भव्य विहिरी बांधीतसे रेलवे ॥
जागोजाग अवश्य तेथ अणिले भूपें नदी-कालवे ॥

उत्तेजी कृषिकर्म गुर्जरधराव्यापारवृद्धीप्रती ॥
ने तेणें नच कोणतीं कधिंहि तीं दुःखें प्रजे गांजती ३५॥

२५. शेतीवाडी खातें.

शार्दूलविक्रीडित.

संस्था आत्मकरें नृपें उघडिली ती शेतिवाडी असे ॥
तीमाजी विविध प्रयोग करुनी लोकांसि दावीतसे ॥
सूधरेल कृषीवल-स्थिति कशी कोणें उपायें वरी ॥
हें तो सूचवि तत्कलापटु-जनां युक्ति स्वयें ती वरी॥३६॥

२६. तगावी; व सारा हलका केला.

शार्दूलविक्रीडित.

तो अश्रांत सदा प्रजाहितिं असे दे आत्म-सौख्या रजा॥
केलीसे करभार-मुक्त बहुधा ती क्षेत्रकारी प्रजा ॥
मुद्रा रौप्यक-लक्षसंमित तयां देई तगावी-मिसें ॥
केलें त्यांसि निजर्णवद्ध जनता आभार मानीतसे ॥३७॥

२७. अद्वैत-वृत्ति. अंत्यज—शिक्षण.

शार्दूलविक्रीडित.

ज्या वाटे कटु जातिभेद बहुसा जो ये न त्याच्या मना ॥
भेदाभेद न ठाउका कधिं न ज्या स्वप्नीं दुजी भावना ॥
तो दे शिक्षण राज-संमत असें हीनां नरां अंत्यजां ॥
ज्यांतें पाहुनि विप्र सर्व म्हणती 'व्हा दूर व्हा दूर जा'॥३८॥

२८. धर्मार्थ दवाखाने.

शार्दूलविक्रीडित.

प्रांतोप्रांत महर्घ भूपति करी धर्मार्थ डिस्पेन्सरी ॥
घेती औषधलाभ रुग्ण दुबळे त्यांचा नव्हे त्या सरी ॥

सं.का.प.
६८०



आशीर्वाद नृपासि देति अवघे आरोग्य जे लाभले ॥
देवा प्रार्थिति इष्टसिद्धिकर हो दीर्घायु मोदें भलें ॥३९॥

२९. सामान्य शिक्षण.

शार्दूलविक्रीडित.

द्याया शिक्षण आंग्ल ऊर्दु गुजरी आणी मराठी तशा ॥
शाळा प्राथमिक प्रसन्न हृदयें स्थापीयल्या थोरशा ॥
कालेजाव्ह वरिष्ठ-शिक्षण-महासंस्था असे स्थापली ॥
कीं ती ज्ञानवती अनेक विषयीं व्हावी प्रजा आपली ॥४०॥

इंद्रवज्रा.

राज्यीं उपर्युक्त अनेक शाला ॥
विद्याप्रसारार्थ महा विशाला ॥
संस्थापियेल्या बहु त्या नृपानें ॥
लोकोपकारास्तव दीनपानें ॥ ४१ ॥

३०. कलाभवन.

वसंततिलका.

उद्योगशिक्षण उदार जनांसि द्याया ॥
तेंवि स्वदेश धनधान्यसमृद्ध व्हाया ॥
आणी दुरूनि बहुशास्त्रविशारदांसी ॥
योजी कलाभवनिं त्यां शिकवावयासी ॥ ४२ ॥

३१. शारिरिक व मानासिक शिक्षण.

शार्दूलविक्रीडित.

राखी हेतु सुपूर्ण शारिरिक तें द्याया जनां शिक्षण ॥
तैसें नैतिक शुद्ध मानसिकही हें भूपसल्लक्षण ॥

आहे शिक्षण हेंचि बीज समजे व्हाया स्वलोकोन्नती ॥
साचें तेंचि सुधारणेसि बरवें तद्बुद्धि ती मानती ॥४३॥

३२. प्रजारोग्य–रक्षण.

शार्दूलविक्रीडित.

विस्तीर्णा पुरवीथिका करुनि तो आरोग्य-संरक्षणा ॥
लक्षी खर्च करी धना बहु महा आश्चर्य लोकेक्षणा ॥
भव्योद्यान विचित्र वृक्षयुत कीं केलें नदीचे तटीं ॥
लोकस्वैरविहारहेतु जनता लाहो सुखाची लुटी ॥ ४४ ॥

शार्दूलविक्रीडित.

अश्रांत श्रमवोनि देह अपुला त्यागोनियां स्वार्थ हा ॥
संपादी जनकाज लाजवि नृपा त्या सार्वभौमा महा ॥
योजी युक्ति उपाय ऊर्जितदशे आणावया लोकता ॥
न्यायातिप्रिय भूपहीरमणिला देवाचि ये योग्यता ॥ ४५ ॥

३३. मुद्रण–स्वातंत्र्य.

शार्दूलविक्रीडित.

चालावें सरळ व्यवस्थितपथें राजाधिकारी-जनीं ॥
सत्तेचा उपयोग दुष्ट न कधीं व्हावा प्रजागंजनीं ॥
व्हावी तन्मनिं नित्य भीति असणें आळाचि तद्वर्तना ॥
भूपें सादर एतदर्थ दिधलें स्वातंत्र्य तें मुद्रणा ॥ ४६ ॥

३४. राष्ट्रीय व सामाजिक परिषदांस जाणें.

शार्दूलविक्रीडित.

होती ज्या प्रतिवत्सरीं जनसभा राष्ट्रीय सामाजिका ॥
मोठ्या आर्यमहीवरी जिथजिथे औद्योगिका प्रांतिका ॥

तेथें जाय परार्थसिद्ध नृप तो स्वेच्छावलें सत्वरी ॥
ज्ञानें स्वीय विशाल थक्क सकलां लोकाग्रणींतें करी ॥ ४७ ॥

शार्दूलविक्रीडित.

दावी त्यां स्वसहानुभूति सुखदा बोधामृतें तोषवी ॥
तेजस्वी दिपवी जगत्प्रतिनिधी भूलोकिंचा तो रवी ॥
अन्या जानपदा कितीक असती संस्था महींचे तळीं ॥
साह्या त्यांसि करी सदा जनहितीं ज्याची मती चेतली ॥ ४८ ॥

शिखरिणी.

असा ज्ञानी राजा स्वतनु जनकाजा झिजविता ॥
विता सौख्या हर्षा कधिं किमपि दुःखा नुरविता ॥
रणीं दानीं मानी न लव निजपाणी फिरविला ॥
धरापृष्टीं त्याचे सम नृप न भूतो न भविता ॥ ४९ ॥

### ३५. मुख्य विषय.

वसंततिलका.

घेणें करीं विषय मुख्य कथानकाचा ॥
त्या वेगळा इतर तो व्यवसाय काचा ॥
या कारणास्तव उपक्रमितों तयातें ॥
वर्णावया नृपतिच्या नमुनी पदांतें ॥ ५० ॥

### ३६. जुबिलीचें वर्ष.

वसंततिलका.

एकोनविंशतिशताब्द निघोनि गेले ॥
ख्रिस्ताचिया शुभशका वरि सात झाले ॥
झालीं विसां अधिक पांच नृपा स्वहातीं ॥
राज्याधिकारपद येउनियां पहा तीं ॥ ५१ ॥

३५३

### ३७. पाश्चिमात्य जुबिली–कल्पना.

चामर.

पाश्चिमात्यलोककल्पना पुराणकालगा ॥
राज्य पंचवीस अब्द भोगितां नृपाल गा ॥
भूपरौप्यजूबिलीमहोत्सवा प्रजा करी ॥
तेच रीति येथ सर्व मंत्रिवृंदही धरी ॥ ५२ ॥

### ३८. दिवाण–केशोस्पजी.

वसंततिलका.

केशोस्पजी सचिववृंदशिरोवतंस ॥
ज्ञानीं चढे म्हणुनि त्याचि महत्पदास ॥
तेणें समस्त जन राजसभागृहातें ॥
बोलाविले हितगुजा वदण्या तयांतें ॥ ५३ ॥

### ३९. जुबिली–उत्सवाबद्दल सभा.

स्रग्धरा.

आला रोमेश चंद्रात्मज सरपदवान् दत्त मोठा अमात्य ॥
डाह्याभाई हिशोबी गणितपटु तिथे प्राप्त झाला अगत्य ॥
त्या मागें वासुदेवाभिध लवकरि ये सूपनामें समर्थ ॥
एवं सानुक्रमानें नृपतिजन महा पातले एतदर्थ ॥ ५४ ॥

शार्दूलविक्रीडित.

फत्तेसिंग युवा सयाजिसुतही आला प्रसंगांत या ॥
जाणों तेथ अदभ्र कौतुक गमे हें श्रेष्ठभागा तया ॥
स्थानाधिष्ठित आपल्या सकलही होतां यथानुक्रम ॥
व्हाया ज्ञात तयां सचीव वदला जो स्वेष्टकार्यक्रम ॥ ५५ ॥

## ४०. वर्गणी.

प्रहर्षिणी.

उत्तिष्ठे सचिव करी सुभाषणाला ॥
प्रारंभीं नृपतिसुनामघोष केला ॥
सर्वांतें स्वमतमनोगतासि सांगे ॥
साह्या त्यांजवळुनि घे यथाविभागें ॥ ५६ ॥

चामर.

मंत्रिवाक्य ऐकतांचि सर्व लोक डोलती ॥
योग्य योग्य ! ठीक ठीक युक्तिवाद ! बोलती ॥
तत्क्षणीं बलानुसार घालिताती आंकडे ॥
वांकडे कुणी न जाति देति साह्य रोकडें ॥ ५७ ॥

## ४१. महाराजांची संमति.

वसंततिलका.

ही कल्पना जुबिलिनामक उत्सवाची ॥
जाऊनि कोणि नृपतीसि वदावयाची ॥
हें त्या स्थळींच ठरलें मग तो दिवाण ॥
झालाचि सिद्ध करि राजगृहा प्रयाण ॥ ५८ ॥

मालिनी.

नृपतिसदनिं जाया स्यंदनारूढ झाला ॥
सचिववर तदा तो राजमार्गें निघाला ॥
निमिषहि नच होतां पातला राजदारीं ॥
उतरुनि मग खालीं जाहला पादचारी ॥ ५९ ॥

भुजंगप्रयात.

महालीं सुखें बैसलासे नृपाल ॥
तया सांगती वृत्त तें द्वारपाल ॥
उठे देइ आज्ञा तया यावयातें ॥
स्वयें सिद्ध हो शीघ्र भेटावयातें ॥ ६० ॥

मालिनी.

सविनय कर मंत्री जोडि कामासि सांगे ॥
परिसुनि नृप हर्षा पावला सानुरागें ॥
अनुमत दिधलें भूपालकें कल्पनेला ॥
सकलजनमनाचा हेतु सिद्धीस नेला ॥ ६१ ॥

हरिणी.

प्रथम जरि घे आढेवेढे तथापि दया करी ॥
निजपदरतां दासां जैसा जगत्पति तो हरी ॥
अनुमत दिलें भूपें हर्षं असें सकलां जनां ॥
सचिव कळवी राया माने जुबीलिसुकल्पना ॥६२॥

४२. पुढची तयारी.

पंचचामर.

तदा पुढील कार्यकारिमंडळी ठरावया ॥
स्वकीय दूत पाठवी सभाजनां अणावया ॥
सुवेळिं सभ्य सर्व येति इष्टकार्यसाधना ॥
करावयासि लाविताति कोणिही उशीर ना ॥ ६३ ॥

चामर.

प्रांतिं चारि पाठवीयली विनंतिपत्रिका ॥
वर्गणी जमावयासि ती महोत्सवार्थका ॥
पौर थोर शेटसावकार यांजपासुनी ॥
द्रव्यकर्षणीं नियोजियेलि मंडळी जुनी ॥ ६४ ॥

### ४३. महोत्सव–तिथिनिश्चय.

शार्दूलविक्रीडित.

झाली निश्चित वद्य षष्ठि वरवी मासोत्तमीं फाल्गुनीं ॥
योग्या तीच महोत्सवा शुभकरी साधावयालागुनी ॥
आहे त्यांतहि भूपजन्मदिन तें तेणें दुधीं शर्करा ॥
होते यास्तव ती दिवाणे सकलां सांगे तिथि स्वीकरा ॥६५॥

चामर.

होलिकासणासि जोडुनी नृपाल दे दिनां ॥
सात आणि पांच उत्सवा करावया जनां ॥
थोर राजमार्गमध्यभागिं सांगतो करा ॥
भव्यशा सपल्लवा कमानि मंत्रि चाकरां ॥ ६६ ॥

### ४४. नगर–शृंगार.

वसंततिलका.

शृंगारिली अखिल सत्वर राजधानी ॥
चोंहीकडोनि शुभसूचक सुध्वजांनीं ॥
झाले अधीर करण्या जन उत्सवातें ॥
मार्ग प्रतीक्षति महादिन ये कदा तें ॥ ६७ ॥

## ४५. प्रजाहर्षोत्सुकता.

सवाई.

हर्ष न माय जनांतरिं उत्सुक होति समस्त वटोदरवासी ॥
प्रेमभरें मनिं चिंतिति केवळ त्या करुणाब्धि सयाजिनृपासी ॥
माय जशी निजबालकपोषणिं कष्ट करी बहु साधि हितातें ॥
तेंवि असे प्रभु हा अमुचा वदती चिर राहु सुखी सुवचा ते ॥६८

सवाई.

स्वामिवरी निजभक्ति विनिर्मळ दाविति ते हरएक उपायीं ॥
भूपति हा कमलावर सत्यचि मानवरूप अम्हां सुखदायी ॥
अब्धिसि हर्ष बघोनि शशांक तयापरि सर्व उताविळ घ्याया॥
स्वप्रभुदर्शन जन्मदिनीं शुभमंगलकारक नाम वदाया ॥६९॥

सवाई.

द्वारिं सडा-शुभमार्जन वासिकतैल तसें उटणें निज अंगा ॥
लावुनि न्हाति सुवस्त्रहि नेसति तो वदवे न कवीसहि दंगा॥
मंदिरशोभन षड्रसभोजन पल्लवतोरण उंच गुढ्याही ॥
द्वारिं उभारिति हर्ष जनांअति होय तया मुळिं अंतचि नाहीं॥७०

सवाई.

यापरि पौरजनांसि गमे सण तो बहु थोर जशी दिपवाळी ॥
नौबत-दुंदुभिवादन गायननर्तनकीर्तन सांजसकाळीं ॥
कंदिल झुंबर दीपहि सुंदर हंडि सतेजहि आरस भारी ॥
केलि असे हृदयांत अहर्निश आटविती नृप तो हितकारी॥७१॥

## ४६. वाढदिवस.

शार्दूलविक्रीडित.

येतां राम दशाननासि वधुनी सारी अयोध्यापुरी ॥
आनंदोत्सवमग्न पौर अवघे तैशीच येथें परी ॥
होतां मंगळषष्ठिचा उदय तो त्या भौमवारीं अहा ॥
भूपाचा जयघोष हो प्रतिपथीं हर्ष प्रजेला महा ॥ ७२ ॥

## ४७. वेदोक्त आशीर्वाद.

हरिणी.

प्रथमसुदिनीं प्रातःकाळीं अहो नृपमंदिरीं ॥
द्विजगण करी गर्दी भारी समुत्सुक अंतरीं ॥
शुचितनु नृपा देती आशीर्वचें श्रुतिमंत्रक ॥
ह्मणतिहि शतं जीवो राजा सदार सपुत्रक ॥ ७३ ॥

## ४८. स्वारीचा थाट.

वसंततिलका.

हें झालियावरि सुकृत्य, बसावयाला ॥
शृंगारिला रथ तयावरि भूप आला ॥
मंत्रीहि मागुति वसे नृपपृष्ठभागीं ॥
ज्यां हो न दर्शन असे जन ते अभागी ॥ ७४ ॥

भुजंगप्रयात.

समारंभ ऐसा न अद्यापि झाला ॥
पुढेंही न होणार वाटे द्विजांला ॥
असो यावरी थाटमाटें निघाली ॥
नृपस्वारि ती राजमार्गासि आली ॥ ७५ ॥

वसंततिलका.

कोणी रथांवरि हयांवरि पादचारी ॥
अंबारिमागुतिहि चालति जाति चारी ॥
एवं पदातिजनवृंद सुमंद चाले ॥
दोहींकडोनि सुपथीं दळभार हाले ॥ ७६ ॥

शार्दूलविक्रीडित.

वारेशांगण भव्य तेंचि ठरलें या सुप्रसंगा असे ॥
स्वारी यास्तव शीघ्र सर्व तिकडे थाटांत कीं जातसे ॥
आदौ राजमहालरोड मग तो आला लहेरीपुरा ॥
तेथोनी सगळेचि मांडविपथें येताति चांपानिरा ॥ ७७ ॥

शार्दूलविक्रीडित.

साधाया सुमुहूर्त तेथ ठरला तो भूप सेना सर्वे ॥
चाले, नागर ढाळिती बघुनि सुप्रेमें तया आंसवें ॥
दोहीं बाजुंसि घेत घेत मुजरे तो स्वप्रजेचे नृप ॥
दीनांचा परिपालक प्रभु निघे तो पूढती सत्तप ॥ ७८ ॥

वसंततिलका.

सामंतमौलिमणिरंजितशासनांक ॥
तो साच वानिति तया बुध रावरंक ॥
ज्याचें असे सतत वर्तन निष्कलंक ॥
तत्कीर्ति लाजवितसे धवला शशांक ॥ ७९ ॥

४९. वारेशाच्या मैदानावरील दरबार–मंडप.

शार्दूलविक्रीडित.

होता भव्य उभारिला परिजनीं तो शामियाना बरा ॥
भारी उंच असा जनां जणुं गमे कीं भेटतो अंबरा ॥

अंतर्भूवरि शुद्धही पसरिलें विस्तीर्णसें जाजम ॥
केला नूतनधौत त्यावरि असे त्या चादरीचा जम ॥ ८० ॥

शार्दूलविक्रीडित.

शोभे हें स्थल मध्यवर्ति सुमहाभूपालसिंहासनें ॥
तैशीं सभ्यजनांसि सन्निध वसाया काष्ठवेत्रासनें ॥
होत्या लावियल्या चहूंकडुनी त्या स्थाना पताकाध्वजा ॥
ऐसा मंडप सिद्ध थोर रचिती गाईकवाडी प्रजा ॥ ८१ ॥

शार्दूलविक्रीडित.

पानें हारतुरे गुलाबजलही वर्खी सुपारी नवी ॥
गंधी अत्तर सर्व भासत कृती दैवी न हे मानवी ॥
त्यांहीं ठेवियलीं भरोनि जवळी तीं हेमताटें बरीं ॥
केव्हां होईल भूपदर्शन असे हा हेतु सर्वांतरीं ॥ ८२ ॥

५०. महाराजांचें आगमन.

मालिनी.

मिरवत अति थाटें भूप ये त्या स्थलाला ॥
मग उतरुनि खालीं आसनारूढ झाला ॥
उठति जवळि येतां सभ्य ते लोक सारे ॥
ह्मणति मनिं अहाहा शोभतो हा कसारे ॥ ८३ ॥

मालिनी.

मग सहपरिवारें बैसला श्रेष्ठ जागीं ॥
धरणिपति सयाजीराव तेथें सुभागी ॥
अनुचर अधिकारी सर्वही कारभारी ॥
करिती मग तयारी पूढची लोक भारी ॥ ८४ ॥

## ९१. दरबारचा देखावा.

मालिनी.

नृपतिशिरीं सुरम्यें चामरें ढाळिताती ॥
परिजन हरिखें दोंबाजुंनीं स्वीय हातीं ॥
जनकृतनति घेई लीन हस्तें तदा ती ॥
बसुनि सुर विमानीं भूपलीला पहाती ॥ ८५ ॥

मालिनी.

जवळि सुरुचिर श्रीराज्ञिचा शामियाना ॥
स्थित सकल तयाचे भोंवती सज्ज सेना ॥
ससखिजन महीपी बैसली मध्यभागीं ॥
समिप उभिच दासी सेवनीं नित्य जागी ॥ ८६ ॥

मालिनी.

अशि सकल तयारी केलिसे फार नामी ॥
अणुभरहि दिसेना तींत कोणासि खामी ॥
त्वरित मग तया दों मंडपीं तेथ जाणा ॥
करिति नटुनि नृत्या विश्वयोषा सुगाना ॥ ८७ ॥

## ९२. मिलिटरीची सलामी.

मालिनी.

स्थित मग नृप होतां तो प्रजाकार्यकामीं ॥
मिलिटरि करि वेगें तोफखानासलामी ॥
ध्वनि अधिक विसां ते एक मोठे जहाले ॥
जनहृदय दणाणे भूमिचा भाग हाले ॥ ८८ ॥

[stamp]

### ५३. दरबारास आलेले युरोपियन अधिकारी.

शार्दूलविक्रीडित.

आला कर्नल रेसिडेंट समया या मीडनामा असे ॥
तैसा फुल्टन नामदार दुसरा तो राजमंत्री दिसे ॥
मोठा चित्रकलाविशारद समारंभा अशा पातला ॥
रेखाया दरबारचित्र तिथलें संपूर्ण जो थाटला ॥ ८९ ॥

### ५४. श्रीमंतांवर पुष्प-वृष्टि.

शार्दूलविक्रीडित.

श्रीमंतांवरि हेमरौप्यकुसुमें आणीक सन्मौक्तिकें ॥
श्रीसौभाग्यवती सुशील चिमणाराज्ञीवरी कौतुकें ॥
वर्षीती कितिही फुलें उधळिती त्या पारशी योषिता ॥
मावेना नृपपोटिं हर्ष बघुनी तच्चित्तसप्रेमता ॥ ९० ॥

### ५५. श्रीमंतांस मानपत्रार्पण.

शार्दूलविक्रीडित.

मोठा जो हरिभक्ति-शेट जगतीं प्रख्यात कीं नागर ॥
वाची तत्सुत मानपत्र लिहिलें हेमाक्षरीं सादर ॥
जें केलें जनतार्थ गुर्जरधराधीशें प्रजावत्सलें ॥
इत्थंभूतचि तें प्रदर्शित तयामाजी नसे गाळलें ॥ ९१ ॥

शार्दूलविक्रीडित.

ऐशा रौप्यमहोत्सवासम पुढें या दीनदासां जनां ॥
यावा लौकरि सुप्रसंग मनिंची ही दर्शिता कामना ॥
होवो रक्षक रक्षितां समय तो दीर्घायु पाहावया ॥
केली पत्रविपूर्ति याचुनि असें सर्वेश्वरा चिन्मया ॥ ९२ ॥

शार्दूलविक्रीडित.

ऐसें वाचुनि मानपत्र सगळें होतां सभासज्जनां ॥
बोलाया उठला मनीं गहिंवरे तो भूप साम्यें उगा ॥
तों चोहींकडुनी महाजयरवें केली जनीं गर्जना ॥
तें पाहोनि दयार्द्रभूपतिचिया प्रेमाश्रु ये लोचना ॥ ९३ ॥

९६. महाराजांचें विनयपूर्वक भाषण.

शिखरिणी.

म्हणे राजा लोकां अपरिमित जे तेथ जमले ॥
प्रजेची आबादी हितसुख-समासादन भलें ॥
सदा हें मी मानीं परम इतिकर्तव्य सगळें ॥
चुके या कामा तो सुगतिपदवीपासुनि ढळे ॥ ९४ ॥

पृथ्वी.

प्रजा मम सुखी तरी सुख मला मिळे अक्षय ॥
असें समजतों मनीं दृढ तसा सदा निश्चय ॥
प्रजा तरिच भूपतिः न नृप आधिं पश्चात् प्रजा ॥
न मानिं जरि तत्व हें तरि तुम्हीं मला कां भजा ॥९५॥

पृथ्वी.

अहो मम अतां तुम्हां विनवणी निदानीं असे ॥
सदोदित सहानुभूति तुमची प्रयाचीतसें ॥
घडोघडि पदोपदीं जनहितार्थ जी जी कृती ॥
करीन मज साध्य हो न तरि ती तुम्हां दुष्कृती ॥९६॥

३९३

पृथ्वी.

जगीं नरपतीवरी जड जबाबदारी अती ॥
सुशिक्षित करावया जनसमूह लागे मती ॥
खरा नृप जनाग्रणी बुधमतेंचि नैसर्गिक ॥
असे प्रगतिसत्पथा चिरसुखप्रदा दर्शक ॥ ९७ ॥

पृथ्वी.

असें सतत मानुनी जगतिं वर्ततों त्यापरी ॥
परिश्रम सदाहि मी जनहितार्थ नाना करीं ॥
सुहेतु लघु राज्य हें वळण होय अन्यां खरें ॥
पवित्र मनिं बाळगीं तुह्मिच मानणें हो खरें ॥ ९८ ॥

पृथ्वी.

असो; जरि न योग्य मी नृपति या सुमाना भला ॥
दिला मज ह्मणोनियां बहु ऋणी असें आपला ॥
महोत्सवाचि हा मम स्मरणिं राहि मत्तोषक ॥
असें वदुनि बैसला जयरवांत भूपालक ॥ ९९ ॥

५७. अभिनंदनपर चोंहीकडून आलेल्या तारा.

शार्दूलविक्रीडित.

तारायंत्रपथें प्रसंगिं शुभ या संदेश आले किती ॥
भूपाल-स्वभिनंदनात्मक चिरारोग्यायु त्या चिंतिती ॥
काशी द्वारवती सुपुण्यनगरी ग्वाल्हेर कोल्हापुर ॥
मुंबापत्तन धार इंदुर अशीं प्रेषीति तारा-पुर ॥ १०० ॥

## ५८. मुंबई येथील जंगी सभा.

शार्दूलविक्रीडित.

टोलेजंग असे महाजनसभा जाहालि मुंबापुरी ॥
त्या पुण्या दिवशीं अपूर्वचि अशी भासे जनांला खरी ॥
प्रेसीडेन्सिअसोसिएशनगृहीं गुर्वी गुरूचे दिनीं ॥
सानंदप्रसभाभिनंदनपरा बोलाविली सज्जनीं ॥ १०१ ॥

शार्दूलविक्रीडित.

होते आंग्ल-अविंध-हिंदु-यहुदी ख्रिस्ती तथा पारशी ॥
सारे भूपतिमित्रमंडळ असे जे चाहते त्या दिशीं ॥
अध्यक्षासन तेथ मंडित करी फेरोजशा मेहता ॥
वर्णी भूपगुणां यथोचित निजें वाक्पाटवें अद्भुता ॥ १०२ ॥

शार्दूलविक्रीडित.

चंदावर्कर न्यायमूर्ति दुसरा ठाकर्शि तो सन्मती ॥
आमीरुदिन तय्यब-प्रभृतिही देती तया संमती ॥
त्याचें स्मारक व्हावया पुरिं इथे जो श्रेष्ठ लोकाग्रणी ॥
झाला अश्रुतपूर्व भूपति जमाया लागली वर्गणी ॥ १०३ ॥

शार्दूलविक्रीडित.

बोले तैं सर भालचंद्र सुवचें वर्णी धरापालक ॥
नाहीं त्या सम या महीवरि खरा तो सार्वभौमाधिक ॥
मोठा जो तलियारखान सुमती सोराबजी पारशी ॥
देई त्या अनुमोदना निज, करी भूपस्तुती फारशी ॥ १०४ ॥

शार्दूलविक्रीडित.

नामें सेटलवाड थोर पदवीधारी वदे सुस्वर ॥
त्यातें अब्दुल कादरें मधुवचें पुष्टी दिली सत्वर ॥

आतां शेवटिं वर्गणी जमविण्या ते मंडळी नेमती ॥
त्याला दाजि खरे सुपूर्ण हरिखें दे आपली संमती ॥१०५॥

शार्दूलविक्रीडित.

टेंका दाजिमता स्वयें त्वरित दे काजी कबीरुदिन ॥
येवो आर्यजनां सदैव वदला हा सोनियाचा दिन ॥
आनंदें समया अलंकृत करी येवोनियां ती सभा ॥
भूपालात्मज जो शिवाजि तिसरा सर्वाधिका तत्प्रभा ॥१०६॥

५९. इतर प्रांतांतील उत्सव.

शार्दूलविक्रीडित.

झाला गायकवाडराजनगरीं हा उत्सव प्रेमळ ॥
तैसा मुख्य विभागिं सर्वहि जनीं केला मनें निर्मळ ॥
धारी पाटण सिद्धपूर डभई ती आमरेळी कडी ॥
तैशी नौसरि; राजभक्ति रुचिरा तीं दाविती रोकडी ॥१०७॥

६०. दरबार–समाप्ति.

वसंततिलका.

केर्शास्पजी उठुनि शेवटिं हो नृपाला ॥
प्रेमें नमी पद करी मुजरा तयाला ॥
त्यामागुनी सकलही; जयघोष झाला ॥
'हे नाथनाथ विजयस्व' सुधी म्हणाला ॥ १०८॥

६१. अवर्णनीय थाट.

मालिनी.

अमरविटपिशाखा-लेखनी भूमि-पत्र ॥
सतत विधिसुता हीं घेउनी चारु-गात्र ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय

लिहिल नृपसभा-संवर्णना सर्व कांहीं ॥
खचित कधिं तयाचा पार येणार नाहीं ॥ १०९ ॥

६२. स्वारीचें परावर्तन.

शिखरिणी.

असा आनंदानें जनकृत-समारंभ वरवा ॥
तदा अंता आला मग करिति सारे जयरवा ॥
नृप-स्वारी मागें तिथुनि अनुरागें परतली ॥
जनांची धी मोदामृत-सुरसपानीं विरतली ॥ ११० ॥

६३. जुबिली-महोत्सवाचें स्मारक ह्मणून देणग्या.

वसंततिलका.

लोकांतरीं सुचिरसंस्मरणीय व्हावा ॥
कीं हा महोत्सव सदोदित आठवावा ॥
या कारणें नृपवरें अति आदरानें ॥
लोकां दिल्या सवलती सढळा करानें ॥ १११ ॥

६४. साऱ्याची भागशः माफी, व माप्तीवरील
कराची मर्यादावृद्धि.

शार्दूलविक्रीडित.

जी भूपा गमली अशक्त अपुली द्यायासि सारा प्रजा ॥
केली ती नृपदानमुक्तचि तदा तेणें तिला हो मजा ॥
होता जो कर पांचशेंवरि जनोत्पन्नासि त्याची मिती ॥
केली सार्धहि सातशें ह्मणउनी सारे तया वानिती ॥ ११२ ॥

### ६५. नवें मार्किट म्युनिसिपालिटीस दिलें, व वाचनालयांस मदत.

शार्दूलविक्रीडित.

न्हायातें निजपत्तनस्थजनतास्वारोग्यसंरक्षण ॥
दे तो नूतनशाकहाटकसमग्रोत्पन्न सल्लक्षण ॥
गांवोगांव जनांसि वाचनरुची लागावया भूपती ॥
स्थापी पुस्तकवृत्तभव्यसदनें द्रव्यासि देवोन तीं ॥ ११३ ॥

### ६६. लष्करी लोकांचे पगार वाढविले.

वसंततिलका.

कर्तव्यदक्ष बहु गायकवाडसैन्य ॥
ज्या शौर्यकर्मिं न दिसे सम कोठ अन्य ॥
त्या सैनिकांवरि करोनि कृपा नृपालें ॥
तद्वस्त्रदस्तसुविमुक्त पगार केले ॥ ११४ ॥

### ६७. एकवीस कैदी बंधमुक्त केले; व सक्तीचें शिक्षण.

शार्दूलविक्रीडित.

भूपालें सदयांतरें करविले ते एक वीसांवरी ॥
कैदी बंधविमुक्त तत्क्षणिं; पहा दातृत्व तद्धी वरी ॥
देशी शिक्षण सक्तिचें पसरण्या रायें स्वराज्यांतरीं ॥
आज्ञा मांत्रिजनां दिली किति नृपौदार्यासि वानूं तरी ॥ ११५ ॥

### ६८. प्रजाविहारोद्यान.

शार्दूलविक्रीडित.

दाटी जेथ पुरीं खरी बहु दिसे वस्ती घना जेथली ॥
सारीं घेउनि तेथलीं जनगृहें बांधावया तत्स्थलीं ॥

भव्योद्यान सुखें विहार करण्या लोकांसि आदेश हा ॥
दे तो थोर नृपाल हेतु जनतासौख्यार्थ ज्याचा महा ॥ ११६ ॥

### ६९. शिष्य-वृत्तींची मंजूरी.

वसंततिलका.

विद्याकलाकुशलताभ्यसना कराया ॥
जे उत्कटेच्छ सुविशिक्षित सिद्ध जाया ॥
त्यां शिष्यवृत्ति करुनी नृप दे विदेशा ॥
प्रेषी असे जनसुखीं सुख ज्या नरेशा ॥ ११७ ॥

### ७०. अनाथाश्रम, व पदक-दान.

शार्दूलविक्रीडित.

स्थापाया गृह तें वटोदरपुरीं नामें अनाथाश्रम ॥
आज्ञापी नृप धीर वीरमणि तो संहारि लोकश्रम ॥
योग्यां तो हरिभक्ति-आदि सुजनां पौरां कितीकांप्रती ॥
अर्पी सुंदर हेमरौप्यपदकांही गुर्जरांचा पती ॥ ११८ ॥

भुजंगप्रयात.

धरा-कामधेनु प्रजा वत्स सर्व ॥
तिचे मानि तो भूप चित्तीं अगर्व ॥
झटे नित्य तद्रक्षणीं दीस-राती ॥
तदा राष्ट्रगा दुर्दशा वीसरा ती ॥ ११९ ॥

भुजंगप्रयात.

समारंभ ऐशापरी तेथ झाला ॥
तया प्रेक्षुनी भूप हर्षी निमाला ॥
असो घेत ते मूजरे त्या सुकालीं ॥
नृपस्वारि तेथोनि मागें निघाली ॥ १२० ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ... पुणे

### ७१. राजमार्गावरील पान-सुपाऱ्यांचा थाट.

हिंदविजय.

मंदाक्रांता.

ठायीं ठायीं पथिं जन करी उत्सवा आदरानें ॥
थांबे तेथें नृपति कुतुकें प्रेमहर्षांतरानें ॥
मध्यें हिंदीविजय ह्मणुनी वृत्तसंपादकाची ॥
भूपीं निष्ठा अमित दिसली नाहिं कोठेंहि काची ॥१२१॥

### ७२. बोलाईमाता व सयाजीविजय.

स्रग्धरा.

स्वारी तेथोनि चाले करिति नमन दोंबाजुनीं लोकपंक्ती ॥
मध्यें बोलाइमातेवरुनि वरुनि तच्चालकस्वामिभक्ती ॥
मार्गांत श्रीसयाजीविजयपति-महामुद्रण-स्थानिं आला ॥
मोठी केली तयारी बघुनि नरपती मानसीं फार धाला॥१२२॥

### ७३. ग्रंथसंपादक व प्रकाशक मंडळी.

शार्दूलविक्रीडित.

येई जी उदया विचक्षणनरां मान्या सुसंस्था महा ॥
श्रीमद्भूपसयाजिकालिं जनताज्ञानांधकारापहा ॥
जी कीं पात्र निजश्रमें परगुणें थोरा तदीयाश्रया ॥
साह्या दे सतत प्रजोन्नति करायातें नृपाला तया ॥ १२३ ॥

शार्दूलविक्रीडित.

ग्रंथां एकतिसां प्रकाशुनि महद्भूपाश्रयाखालती ॥
ज्ञानाची परिवृद्धि गुर्जर-महीमाजी स्थलीं अन्य ती ॥
केली विश्रुत भूपकीर्ति जगतीं विद्याभिलाषी असे ॥
तद्द्वारें बहु कष्ट घे क्रम पुढें तैसाचि ठेवीतसे ॥ १२४ ॥

शार्दूलविक्रीडित.

राजा भोज पुरा सुपंडित जसा होवोनि गेला पहा ॥
तैसा श्रेष्ठगुणें सयाजिनृपती विद्वच्छिरोरत्न हा ॥
यद्राज्यीं असती अनेक कवि ते श्रीकालिदासादिक ॥
संस्था त्यापरि मंडळी नृपपुरीं सद्ग्रंथसंपादक ॥ १२५ ॥

शार्दूलविक्रीडित.

जी अत्यंत नृपर्णबद्ध जगतीं सद्योग्यता पावली ॥
अर्पी मंगल या जुबीलि-समयीं सुस्वाष्ट-पद्यावली ॥
त्या अग्रस्थल वृत्त-पत्रि निज दे साप्ताहिकीं सत्वर ॥
केली भक्ति परा नृपालचरणीं ती व्यक्त हो सादर ॥१२६॥

## ७४. सहविचारिणी सभा.

प्रियंवदा.

तदुपरी सहविचारिणी-सभा ॥
विखरि लोक-तम शीघ्र यत्प्रभा ॥
नृपतिला रुचिर मान-पत्रिका ॥
सह-सभासदचि दे सपुत्रका ॥ १२७ ॥

## ७५. राजे घोरपडे.

यूथिका.

शूर वीर सरदार हि घोरपडे ॥
यत्समान विनयी नच सांपडे ॥
पान आणिक सुपारि समर्पुनी ॥
राजभक्ति निज दावितसे गुणी ॥ १२८ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ... नं. ... ता. ... (स्थळ प्रत) ठाणे

### ७६. क्षत्रिय-मराठा समाज.

मालिनी.

तंव पुढति मराठाक्षत्रियांचा समाज ॥
नृपति वहु झटे जो साधण्या लोककाज ॥
जमुनि पथिं तयातें स्वामिभक्तीसि दावी ॥
सविनय कृति त्याची मी किती हो वदावी ॥१२९॥

### ७७. मुनिसिपालिटीचें मानपत्र.

वसंततिलका.

सन्मान राजपथिं यापरि घेत चाले ॥
कोठीवरोनि नृपराज पुढें निघाले ॥
दे सन्मनें मुनिसिपालिटि मानपत्र ॥
जें घ्यावया सुकृतिनें नृप हाचि पात्र ॥ १३० ॥

शिखरिणी.

असा जागोजागीं नृप लभुनि मानार्पण-विधी ॥
प्रमोदें चालीला सदलजन तो सद्गुणनिधी ॥
महाथाटें वाटे मिरवतचि ये राजसदनीं ॥
असे चिंता ज्याला सतत जनदारिद्र्यकदनीं ॥ १३१ ॥

### ७८. रात्रींचा दीपोत्सव.

शार्दूलविक्रीडित.

रात्रौ तद्दिनिं जाहली चहुंकडे दीपोत्सवें आरस ॥
भासे पाहुनियां तया पुढति कीं ज्योत्स्ना पडे नीरस ॥
शोभे राजमहाल रोड सगळा तैसा लहेरीपुरा ॥
कोठी-मांडवि दीप-पंक्ति बघण्या सारी प्रजा आतुरा ॥१३२॥

वसंततिलका.

“दीपावली-सण अह्मां जणुं आज वाटे” ॥
जे चालती ह्मणति हें मनिं राजवाटे ॥
गर्दीं बहू उसळली गमती पहाया ॥
मुंगीस मार्ग न मिळेचि पथीं रिघाया ॥ १३३ ॥

### ७९. गरिबांस वस्त्रान्नदान.

भुजगप्रयात.

अनाथां द्वितीये दिनीं अन्नदान ॥
तसें वस्त्रहीनांसिही वस्त्रदान ॥
पुरीं सर्व लोकांसि आनंद तेणें ॥
खरी गोष्ट सांगावया काय भेणें ॥ १३४ ॥

### ८०. सैन्याची कवाईत, व फळफुलांचें प्रदर्शन.

शार्दूलविक्रीडित.

वारेशांगणिं साधिकारिजन तो सैन्याचिया चापला ॥
राणीपुत्र समागमें कुतुहलें गेला पहाया भला ॥
सायंकाळिं करी प्रदर्शन कमेटी-नाम-बागीं खुलें ॥
जेथें सर्व फळें विचित्र कुसुमें मांडीयलीं कौशलें ॥ १३५ ॥

### ८१. जुबिली-वृक्षारोपण, व कन्या-संमेलन.

पृथ्वी.

तृतीय दिनिं भूप तो जनसमूह घे आपला ॥
त्वरें उपवनासि ये जुबिली-वृक्षही रोपिला ॥
अनंतर महाशय स्वपुर-कन्यकामेलन ॥
सुधी बघुनि न्यायमंदिरिं अतीव आनंदन ॥ १३६ ॥

## ८२. आगडांतील खेळ.

चामर.

आगडाख्ययुद्धभूमिमाजि येति सर्वही ॥
जेथ साठमारि डाकदारि मल्ल-कुस्तिही ॥
कीर तोफ सोडि दावि कौशला स्थलीं तया ॥
भांडती महीष उंट मेषही करी हयां ॥ १३७ ॥

## ८३. शेवटचा दिवस.

वसंततिलका.

ऐशापरी दिवस पांच महोत्सवाचे ॥
गेले न ते कविस वर्णवती स्वबाचे ॥
आनंद-राज्य सकला नगरांत झालें ॥
लोकीं सयाजिनृपनाम सुघोष चाले ॥ १३८ ॥

वसंततिलका.

तो शेवटील दिन पांच दिसांपरीस ॥
मोठा; पडे न कुणि वर्णनिं त्या भरीस ॥
तत्रापि अल्पमति तद्दिनवृत्तसार ॥
मी देतसें कुणिहि मानुं नका असार ॥ १३९ ॥

## ८४. मुलांस मिठाई.

वसंततिलका.

एतन्महोत्सवनिमित्त समस्त शालां- ॥
माजी नृपाल लघुबालकबालिकांला ॥
वांटी स्वदेशि नवपाचित मिष्ट खाऊ ॥
या कामिं शुद्ध नृपहेतु न तो दिखाऊ ॥ १४० ॥

## ८५. टॉर्च-लाईट प्रोसेशन.

शार्दूलविक्रीडित.

आली जैं अधिकारिचित्तिं पहिली ही कल्पना नूतना ॥
नांवानें जुबिलीमहोत्सव करायाची; तदा चिंतना ॥
जो तो आपुलिया परी सुविमला ती राजनिष्ठा खरी ॥
दावाया नृपतीस संधि झटला शोधावया साखरी ॥ १४१ ॥

## ८६. पदवीधरादिकांची सभा.

शार्दूलविक्रीडित.

भाषाशास्त्रकलांत आंग्लपदवीधारी महापंडित ॥
ते एके दिनिं शीघ्र सर्व जमले स्वस्थानिं होती स्थित ॥
कोणी सज्जन " एलएलबि " कुणी कोणी बिए एम ए ॥
कोणी शुद्ध "बिएस सी" ह्मणविते ज्ञानी महद्धाग्र्यें ॥ १४२ ॥

## ८७. या कल्पनेचा उत्पादक दोराबजी पटेल.

शार्दूलविक्रीडित.

हाईस्कूलिं बिए-पदान्वित वरज्ञानी महाध्यापक ॥
जो दोराबाजि तोचि सत्य नव या युक्तीसि उत्पादक ॥
तेणं सूचविलें सहाय सुजनां कीं वाटतें मन्मना ॥
तें सर्वां जरि आवडे तरिच हो पूर्णा मनः कामना ॥ १४३ ॥

शार्दूलविक्रीडित.

मोठा मान ह्मणोनि जो जगतिं या जो सर्वथा दुर्लभ ॥
तो पावो गुजराथखंडधरणीसप्रेम-सद्वल्लभ ॥
जो मान प्रभु-वीर लॉर्ड रिपना श्रेष्ठीं जनीं दीधला ॥
तो घेवो नृप 'टॉर्च-लाइट-महा-प्रोसेशनें" आपला ॥ १४४ ॥

वसंततिलका.

दोराबजी-जनित सुंदर कल्पना ही ॥
आला कुणी सुमति तीजसि आड नाहीं ॥
ही योजना बहु-मतें ठरली पसंत ॥
साध्या कशी बिकट प्रश्न चहूं दिसांत ॥ १४५ ॥

## ८८. श्री. संपतरावांची मदत.

मंदाक्रांता.

मोठ्या कार्या कठिण अवधी राहिला फार थोडा ॥
त्यामाजी जे लघुमति तदा घालिती शीघ्र मोडा ॥
तेव्हां धीरें बहुत धरिला धीर दोराबजीनें ॥
चित्तोत्कंठा नृप-अनुज-संपत्तरायासि त्या ने ॥ १४६ ॥

स्रग्धरा.

श्रीसंपद्राज सारें परिसुनि बहुसा तोषला मानसांत ॥
तेणें दोराबजी हो त्वरित सहज साशंक चित्तांत शांत ॥
संपादी साह्य त्याचें चपल परतला साधण्या इष्ट काजा ॥
लागा कृत्या ह्मणे तो उशिर करुं नका सिद्ध व्हा आपल्या जा ॥

## ८९. प्रोफेसर नाईक.

वसंततिलका.

आंग्लेतिहासपटु नायक-सूपनामा ॥
जो सर्वदा बहुत सिद्ध नृपालकामा ॥
भीकाजिचा सुत सुधीजन पांडुरंग ॥
रंगे सुकार्य करण्यांत तदंतरंग ॥ १४८ ॥

...ठी ग्रंथ ... ठाणे

## ९०. रा. सा. अष्टेकर.

वसंततिलका.

अष्टेकर-प्रभृति शिक्षक-वर्ग सारा ॥
तो लागला उरकण्या मग हा पसारा ॥
साह्यासि त्यांसि बहु देति अनेक अन्य ॥
सत्कर्मि मानिति अशा अपणा सुधन्य ॥ १४९ ॥

## ९१. स्वारीचा दिवस.

शार्दूलविक्रीडित.

या कार्या सुमुहूर्त योग्य ठरला ती वद्य एकादशी ॥
सायान्हीं रविचे दिनीं मिरविण्या स्वारी तदा मंदशी ॥
एतत्सूचक पत्रिका अवसरीं त्या काढिल्या चालकीं ॥
व्हाया विश्रुत शुद्ध सर्व नगरीं तत्प्रेम भूपालकीं ॥ १५० ॥

## ९२. कालेजपटांगणांतील तयारी.

वसंततिलका.

प्रोफेसरादि लघुशिक्षक शिष्यवृंद ॥
आले प्रभात-समयीं स्थलिं त्या अमंद ॥
हायस्कुलांगण सुशोभित तें कराया ॥
दक्ष प्रसंगिं खपती सगळे परा या ॥ १५१ ॥

अनुष्टुप्.

प्रवेशद्वार तें आधीं पताकाध्वजतोरणीं ॥
शृंगारिति महायत्नें योग्य हो नृपकारणीं ॥
बालक्रीडांगणा तेंवी सेवकीं शोभवीयलें ॥
नंदनोपवनातुल्य प्रेक्षकां जणुं भावलें ॥ १५२ ॥

## ९३. म्युनिसिपालिटीचें काम.

अनुष्टुप्.

मुन्सिपालिटि कामातें लागली शीघ्र आपल्या ॥
सिंचनें करिती स्वच्छ वीथिका थंड तापल्या ॥
प्रेषि ती खानगी डेरे राहुट्या तंबु सत्वर ॥
जनानी आणि मर्दानी साहित्यासह चाकर ॥ १५३ ॥

## ९४. प्रेक्षकांची गर्दी.

शार्दूलविक्रीडित.

केली यापरि योग्य रम्य-रचिता सारी तयारी तदा ॥
येऊं प्रेक्षक लागती हळुहळू त्या सुस्थळा हर्षदा ॥
विद्यार्थी बसती समस्तही निजस्थानांवरी नेमिल्या ॥
लब्धामंत्रित अन्य तेथ बसती वेत्रासनीं दाविल्या ॥ १५४ ॥

## ९५. सरदार-दरखदार वगैरे.

वसंततिलका.

येती समस्त सरदार दरख्खदार ॥
ते कामदार सरकारि हि सावकार ॥
तैसेचि आंग्लपदवीधर सर्व येती ॥
सानंद तत्स्थिति तदा वदतां न ये ती ॥ १५५ ॥

## ९६. महाराजांचें आगमन.

शार्दूलविक्रीडित.

एवं राज-अमीर आदि सुजनीं तें स्थान संशोभलें ॥
सभ्य स्त्रीपुरुषीं तथैव इतरीं सोत्कंठ लोकीं भलें ॥
केव्हां येइल भूप या स्थलिं अशी मार्गप्रतीक्षा करी ॥
आला तों इतक्यांत पूर्ण करण्या सभ्यांतरेच्छा खरी ॥ १५६ ॥

## ९७. श्रीमती महाराणीसाहेबांचें आगमन.

शार्दूलविक्रीडित.

राज्ञी वैभवशालिनी भगवती मोदान्विता सद्भवा ॥
आली ती निजकन्यकासुतयुता प्रेक्षावया उत्सवा ॥
नेपथ्यांतरिं जाउनी परिजनीं ती आदृता त्यावरी ॥
हायस्कूल-वरिष्ठ-शिक्षक तदा कार्यक्रमातें वरी ॥ १५७ ॥

## ९८. मुलांच्या खेळांस प्रारंभ.

शार्दूलविक्रीडित.

उड्डाणा अतिउंच तेथ मगही दीर्घा नृपा दावती ॥
पश्चात् बैसिकलाविरूढ कितिही ते चापलें धावती ॥
मृत्कुंभा शिरिंधावती धरुनियां चित्तीं अहंपूर्विका ॥
कांहीं लोळत चालती महिवरी भूपा हसूं ये फुका ॥१५८॥

शार्दूलविक्रीडित.

जानू बांधुनि एकमेक पळती खोखो दुजे खेळती ॥
कोशीं घालुनि दोन्हि पाय पडती आश्चर्य भूपा अती ॥
कोणी रज्जुसि ओढिती समबली दोंबाजुंनीं बालकें ॥
मार्गीं त्या प्रतिबंध होत असतांही धावती कौतुकें ॥ १५९ ॥

शार्दूलविक्रीडित.

कोणी तीन पदांसि बांधुनि पथीं धावावया लागती ॥
ती कांहीं सुविचित्र नूतन खरी वाटे नृपाला गती ॥
येती पूढति बालमल्ल सजुनी ते द्वंद्वयुद्धाप्रती ॥
अंगींचें चपलत्व दाविति गमे रम्या नृपा तत्कृती ॥ १६० ॥

शार्दूलविक्रीडित.

एवं बालतति स्वयें कसरती दावीत नानापरी ॥
तेणें भूपति चित्तिं फार हरिखे ती वर्णवेना परी ॥
कोणी वानिति बालचापल दुजे कोणीहि तच्छिक्षका ॥
शालेशा कुणि चिट्ठि एक परि तो हें श्रेय घ्याया निका ॥१६१॥

९९. श्रीमंतां हातीं मुलांस बक्षिसें.

शार्दूलविक्रीडित.

अंतीं भूपति पारितोषिक तदा दे त्यां तदाकांक्षकां ॥
गर्दी हो निबिडा तिथें श्रम पडे पोलीस-संरक्षकां ॥
भूपाल स्वकरें कितीक शिशुंतें अर्पीत सूपायनें ॥
सोंपी शेष विधि प्रहर्षितमना संस्थाधिपाकारणें ॥ १६२ ॥

१००. संतोषप्रदर्शन.

शार्दूलविक्रीडित.

तेव्हां पार्थिव आदरें उठुनियां योग्या वचा बोलतो ॥
संस्थाचालकमानअर्पण-विधि स्वीकारि साभार तो ॥
व्यायामीं शिशु पाटवा बघुनियां संतोष हो मन्मना ॥
प्रेमें सद्गदितांतरें वदत त्यां हो पूर्ण तत्कामना ॥ १६३ ॥

१०१. पानसुपारी.

शार्दूलविक्रीडित.

भूपा पानसुपारि-हारगजरे-इत्यादि अष्टेकर ॥
श्रीराज्ञीप्रति तेंवि दे सुविनयें जोडोनि दोन्ही कर ॥
ऐसा हा विधि युक्त होत असतां सन्मान्यसा हीकडे ॥
होती सिद्ध मशालि हातिं धरुनी सानंद ते तिकडे ॥ १६४ ॥



३६३

## १०२. टॉर्च-लाईट-स्वारीची तयारी.

शार्दूलविक्रीडित.

कोणी सुंदर देशि शुद्ध दिवट्या हातीं उभे राहती ॥
अन्या हातिं भडोच-हूनि अणिल्या कार्बाइटाच्या किती ॥
कोणी केवळ सिद्ध होती कुतुकें चालावया मागती ॥
चित्तीं मानिति भाग घे समयिं जो या त्या घडे सद्गती ॥१६५॥

## १०३. स्वारीचा अनुक्रम.

शार्दूलविक्रीडित.

अग्रीं पोलिस-फौजदार निघती स्वारां सवें घेउनी ॥
बंदोबस्त पथीं समग्र बरवा राखावया लागुनी ॥
त्यांचे मागुनि लष्करी-जन निघे शस्त्रास्त्रधारी पहा ॥
मोदें वाजवि या प्रसंगिं शुभही तो फ्रेंचबाजा महा ॥ १६६॥

## १०४. प्रोफेसर, ग्रॅजुएट वगैरे.

शार्दूलविक्रीडित.

जाती अंडर-ग्राजुएट सगळे सर्वांपुढें चालत ॥
त्यां मागें पदवीधर प्रमुखही औत्सुक्यता दावित ॥
झाला तो पथ त्यांचि मागुनि खरा प्रोफेसरालंकृत ॥
भूप-स्वारि सुमंदमंद सुरथारूढा असे शोभत ॥ १६७ ॥

स्रग्धरा.

सर्वां आधीं मसाणी नटुनि थटुनि तो थोर विद्याधिकारी ॥
दीपा कार्बाइटाच्या धरुनि निज करीं यत्प्रभा तीव्र भारी ॥
चाले त्या जोडि आर्ते करनिकट गुरु श्रेष्ठ तो संस्कृताचा ॥
मीयां नोवाबअल्ली जवळि मग दिसे दीप दोरावजीचा ॥१६८॥

नं. .......
ता. .......
ठाणे

स्रग्धरा.

माजी कॉलेज-अध्यापक असुनि अतां साह्यकारी दिवाण ॥
झाला तो दीपधारी विनययुत मनूभाई मोठा सुजाण ॥
त्या मागें सावकाशें मिरवत सुगती रावजीभाइ चाले ॥
तत्सान्निध्या मशाली धरुनि दिपविलें भाईलालें पटेलें ॥१६९॥

स्रग्धरा.

कोठावालेत्युपाव्हें अनुपम हरिखें खानबाहादुरानें ॥
विद्यार्थी पूर्विचा जो, ह्मणुनि धरियलें ग्यासदीपासि मानें ॥
तैसे नागीनभाई मधुनि चमकती आणि संतोकभाई ॥
गोळे कोर्डेहि गुप्ते पथतटिं चलती जाहली फार घाई ॥१७०॥

१०५. इतर मराठे विद्वान् वगैरे स्वारीमागें.

शार्दूलविक्रीडित.

श्रीमत्संपतराव भूपति-रथा मागोनियां चालती ॥
तैसे वृद्ध उखाजिराव ह्मणुनी काका दुजे शोभती ॥
त्यां मागें हरिभक्ति शेट नगरीं जे थोर लक्षापती ॥
मोदें ठाकुरराज चालत मियाग्रामेश मंदागती ॥ १७१ ॥

शार्दूलविक्रीडित.

तो मुत्सद्दि समर्थराव निकटीं दीवाण बाहादुर ॥
खासेराव तसाचि रावपदवीधारी न तोही दुर ॥
डायाभाई नगीन मोति अणखी गोविंदभाई सुधी ॥
लक्ष्मीलाल धुरंधर-प्रभृतिही ते चालती सन्निधी ॥ १७२ ॥

शार्दूलविक्रीडित.

अंबेगांवकर महर्षितमना हूजूर सेक्रेटरी ॥
त्यामागोनि पवार राव शिरके ते गोखले ना दुरी ॥
शिंदे-धोंड-परांजपे-जगदळे सारे मराठे गडी ॥
जोड्या चालति मंदमंदगति त्या घालोनियां पागडी ॥१७३॥

१०६. जयाशीर्वाचक शब्दांचा घोष.

शार्दूलविक्रीडित.

बोले कोणि " सयाजिराव नृपतीकी हो सदाही जय " ॥
" वंदे मातरमस्तु " कोणि वदती नाहीं कुणाचें भय ॥
" हो दीर्घायु घणीखमा जुगजुगे जीवो " असें गुर्जर ॥
कोणी "अक्षय भूपती चिरसुखी नांदो बली निर्जर"॥१७४॥

१०७. दिवट्यांची संख्या.

वसंततिलका.

कालेज-शिष्यगण पूढति सर्व चाले ॥
विद्यार्थि मॅट्रिकहि मागुनि ते निघाले ॥
ते दीप आणि दिवट्या मिळुनी पहाती ॥
मोजोनियां जवळि पांचशतेंचि होती ॥ १७५ ॥

१०८. बंदोबस्त.

शार्दूलविक्रीडित.

स्वारीमागुनि सद्गृहस्थ अवघेही पादगा नागर ॥
तत्पश्चात् अवशिष्ट सैनिक-पदाती चाललें लष्कर ॥
सर्वां शेवटिं मार्गगामिजनता बाजूसि सारावया ॥
पूकारित ' हटो हटो ' निजमुखें पोलीस देती भया ॥१७६॥

## १०९. स्वारीचा अश्रुतपूर्व थाट.

शार्दूलविक्रीडित.

झाला थाट अलौकिक प्रथम हा या आर्यभूमीवरी ॥
वाटे राम दशाननासि वधुनि जातो अयोध्यापुरीं ॥
मार्गीं दुंदुभि वाजती जयरवें तो प्रांत कोंदाटला ॥
प्रेमें भूपति-कंठ भक्ति अचला पाहोनियां दाटला ॥ १७७॥

## ११०. स्वारी निघाली.

शार्दूलविक्रीडित.

कालेजांगण सोडलें जनयुता स्वारी सुमंदा गती ॥
चाले हर्षभरें प्रसन्न हृदयें गर्दी नृपा संगती ॥
दीपां त्या बघतां गमे उगवले कोट्यावधी भास्कर ॥
संक्षेपें जरि सांगणें खचित कीं तो दीप-रत्नाकर ॥ १७८॥

## १११. कोठीजवळ राजरथाचे घोडे सोडले.

शार्दूलविक्रीडित.

आनंदीपुर टाकुनी त्वरितही मागें; पुढें चालले ॥
श्रीमंत प्रभु घेत लोकमुजरे कोठीपथा पातले ॥
राजस्यंदन अश्वमुक्त करुनी तेथोनियां पंडितीं ॥
लोकीं ओढियला तया स्थलिं महादीप-प्रभा पाडिती ॥ १७९॥

## ११२. पदवीधर, विद्यार्थी वगैरे गाडी ओढतात.

शार्दूलविक्रीडित.

भारें वाहक पीडिती रथगता आकर्षणीं यास्तव ॥
टाकी काढुनि शक्य सर्व रथिंचें सामान भूवासव ॥
आधीं माणिकपुत्र दीपधर तो पट्टेल दोरावजी ॥
ओढी मागुति सर्व बालकचमू तत्सेवनासक्त जी ॥ १८०॥

शार्दूलविक्रीडित.

भाई शंकर दास लाल अणखी ते पारशी नागर ॥
नानाजाति समस्त भूपतिरथा ओढावया सादर ॥
कोणी साहिब राव थोर दिसती या सुप्रसंगीं भले ॥
स्वामी-सेवन-दक्षता निज तिथे दावावया लागले ॥ १८१ ॥

११३. आनंदाची गर्जना.

शार्दूलविक्रीडित.

गाती नाचति नामघोष करिती "सच्छ्रीसयाजी" मुखें ॥
"भूप त्वं विजयस्व जीव सुचिरं" हें गर्जती ते सुखें ॥
चाले गाडि हळूहळू गडगडा ती राजमार्गें तदा ॥
प्रासादाजवळील भूमिवरती आली प्रजाहर्षदा ॥ १८२ ॥

११४. राजमहालापुढील रस्त्यांत गाडींतच उभें राहून महाराजांचें भाषण.

शार्दूलविक्रीडित.

भूपालें इतुक्यामध्यें निजरथामाजीच ऊठोनियां ॥
केलें भाषण निष्कलंक जनताभक्तिसि पाहोनियां ॥
लोकीं त्या समयीं महा-जयरवा उच्चारिलें तीनदां ॥
'शाधि त्वं शरदःशतं' वदति त्या लोकाग्रणी मानदा॥ १८३॥

शार्दूलविक्रीडित.

बोले तो सदयांतरें मग जनां ते शांत झाल्यावर ॥
या मानासि न पात्र मी नर असें; या एक तो श्रीवर ॥
ऐशा भक्तिपुरःसरा सुविमला मानें महत्तोष या ॥
झालासे मज फार; तो अबल मी शब्दांत दावावया॥ १८४॥

ूलविक्रीडित.

कलिकीं मोठ्या प्रमाणावरी ॥
त्सव मला तेणेंचि तृप्ती खरी ॥
ांत फारचि दिसे हे अद्वितीया कला ॥
रलें असे हृदय हें कीं बोलवेना मला ॥ १८५ ॥

शार्दूलविक्रीडित.

जेव्हांप सुनि घेतलीं असति मी मद्राज्य-सूत्रें करीं ॥
अब्दें तीं शुभ पंचवीस दिवसा त्या जाहलीं हो खरीं ॥
या अल्पा अवधींत जीं मम करें कार्यें बरींवाईट ॥
झालीं लोक हिताहितार्थ सगळीं माना न त्यांचा विट ॥ १८६ ॥

शार्दूलविक्रीडित.

सत्याचा अप शप होउनि कुणा मी कैक वेळां असें ॥
द्याया न्याय ख रा तुह्मांसि चुकलों अस्वस्थशा मानसें ॥
ठेवा तें स्वमनीं न; मद्विनतिही हो मान्य पावा मला ॥
राहो निश्चल भ क्ति हो मजवरी ती पूर्ववत् प्रेमला ॥ १८७ ॥

११९. समाप्ति.

शार्दूलविक्रीडित.

ऐशी याचुनि यां क्षमा मृदुवचें लोकांपुढें सादर ॥
प्रासादांतरिं जाय भूप जनताभक्तिप्रहृष्टांतर ॥
सारे वंदु नियां गृहा परतले मोदें प्रजावत्सला ॥
भासे तो दिन कीं अलौकिक जनां स्वर्लोकिंचा मासला ॥ १८८ ॥

११६. राजघराण्यांतील म

रोग्याबद्दल ईश॥

शार्दूलविक्रीडित.

विश्वाधार महालसापति गुणातीता दयासागरा ॥

खंडोबा मणिमल्लदैत्यदमना आराध्यदेवेश्वरा ॥

ठेवीं गायकवाडवंश अवनीमाजी जयी सर्वदा ॥

त्याची कीर्ति दिगंतरीं विशदशी हो भक्तसौख्यास्पदा ॥ १८९॥

शार्दूलविक्रीडित.

एतत्क्षात्रकुलावतंस सुगुणी राजा सयाजी भला

झाला दीप जसा प्रकाश पसरी चोंहीकडे आपल॥

विद्वद्रत्नशिरोमणी सतत जो कष्टे जनांच्या हित ॥

राहो त्वद्वरदायिहस्त शिरिं बा नाशीं तदीयाहि ॥

तां ॥ १९० ॥

शार्दूलविक्रीडित.

राणी सद्गुणराशि शूर चिमणाबाई वरश्रीमत

सौभाग्यें विलसो अखंड पतिचे साह्यार्थ हो ॥

ती विद्वद्युवतीजनप्रमुखता पावो महीचे तली तन्मती ॥

यद्वी गुर्जरखंडलोकभरणीं राहो सदा री ॥

पद्धी ॥ १९१ ॥

शार्दूलविक्रीडित.

जी रूपें सुगुणें स्वतातजननींहूनी खरी शोभ

ज्ञानें जी विदुषीततिप्रवरशी लोकीं यशा लाभली ॥

सौजन्यप्रयुता नरेश्वरसुता श्रेष्ठाभिधा इंदिरा ॥

राहो निश्चल चित्त त्या कुमरिचें ज्ञानार्जनीं सुंदरा ॥ १९२॥